खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

## ग्रीन क्लब

## **पाणी तपासणी उपक्रम**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या ग्रीन क्लबच्या अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023 – 24 मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग आणि ग्रीन क्लब यांनी संयुक्तपणे पाणी तपासणी हा उपक्रम घेतला. ग्रीन क्लबच्या 10 विद्यार्थ्यांनी आपापल्या गावांमधून, राहत्या स्थळाहून वेगवेगळे पाण्याचे नमुने गोळा केले. विहीर, नदी, कूपनलिका, कुंड अशा विविध स्त्रोतामधून पाण्याचे नमुने गोळा केले. या पाण्याची तपासणी करण्यासाठी रसायनशास्त्र प्रयोगशाळेत ते जमा केले.

रसायनशास्त्र प्रयोगशाळेत या संदर्भात एक छोटा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी.एस.कुलकर्णी, डॉ. योगेश वाळुंज, प्रा. नीता डोंगरे, डॉ. सुनीता जाधव आणि ग्रीन क्लब समन्वयक डॉ. दादासाहेब मारकड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. डी.एम.मारकड यांनी केले. मा. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना पाण्याचे महत्व व त्याची शुद्धता किती महत्वाची असते हे समजावून सांगितले. त्यानंतर पाणी तपासणी संदर्भात डॉ. पी.एस. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. डॉ. योगेश वाळुंज यांनी पाणी तपासणी करताना कोणकोणते मापदंड वापरले जातात याची माहिती दिली. पाण्याचा सामू, कठीणत्व, क्षार इत्यादी कसे तपासावे या विषयी माहिती दिली. डॉ. सुनीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक करून दाखवले तसेच त्यासंबंधी माहितीही दिली. यावेळी ग्रीन क्लबचे सुमारे 15 विद्यार्थी उपस्थित होते.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

Dr. Shirish S. Pingale
**Principal**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune




रसायशास्त्र विभागात पाणी तपासणी कार्यक्रम प्रसंगी प्रास्ताविक करताना डॉ. डी.एम.मारकड




पाणी तपासणी कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

Dr. Shirish S. Pingale
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune.




पणी तपासणी कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. पी.एस. कुलकर्णी, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. डी.एम.मारकड, प्रा. नीता डोंगरे, डॉ. सुनीता जाधव.




पाण्याचा सामू, कठीणत्व इत्यादि बाबी विद्यार्थ्यांना समजावून देताना डॉ. योगेश वाळुंज

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

Dr. Shirish S. Pingale
**Principal**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune.




पाणी तपासणी प्रक्रिया समजावून सांगताना डॉ. सुनीता जाधव

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

Dr. Shirish S. Pingale
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune.